


साप्ताहिक

संघर्षाचा आवाज

प्रशासकीय व सामाजिक व्यवस्थेचा समतोल साधणारा...

पुणे, ठाणे आणि मुंबईसह महाराष्ट्रातील घडामोडींचा वेध घेणारे वृत्तपत्र

संपादक : संजय सोनवणे

■ RNI. NO. MAHMAR/2013/52905
■ DECL. NO. SDM/SR/11/2013
■ https://sangharshachaaawaz.in

■ वर्ष : १४ वे ■ अंक : १० वा ■ सोमवार दि.२८ सप्टेंबर ते ०४ ऑक्टोंबर २०२६ ■ किंमत : २ रु. ■ पाने – ०४

निवडणूक आयोगावर प्रश्नचिन्ह... पान २ वर | केंद्रीय निवडणूक आयोग भारत... पान ३ वर | दुष्काळावर मात करण्यासाठी... पान ४ वर

अनुसूचित जाती व जमातीच्या लोकांना फायदा होणार आणि कोणत्याही धार्मिक क्षेत्राशी काम संबंधित नाही म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाची करोडो रुपयांची कामे जोरात

जनहितार्थ कामाच्या नावाखाली 'अनावश्यक' खर्चामागे 'अर्थकारण' दडले आहे का?



दि.११/९/२०२६ रोजी काम करताना



पुणे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी काम बंद केले



दि.२३/९/२०२६ रोजी वेगाने काम चालू असताना

पदवीधर मतदारसंघाची निवडणूक जाहीर झाल्याने आचारसंहिता लागू झाली आहे. या आचार संहितेत कित्येक कामांना ब्रेक लागलेला आहे. पुणे महापालिकेतील अत्यावश्यक कामे करण्यासाठी स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांची परवानगी घेवून अत्यावश्यक कामे सुचविली आहेत. या कामामध्ये अत्यावश्यक कामे यांचीच दखल घेण्यात आली आहे. असे असताना सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे महानगरपालिका यांच्याकडून नाहरकत दाखला घेवून आचारसंहितेमध्ये काम कसे काय करू शकतात? हा प्रश्नच आहे. सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे सार्वजनिक बांधकाम विभाग, उपविभाग क्र.३ यांच्याकडून पुणे महापालिकेच्या कसबा-विश्रामबागवाडा क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त यांना मा.खा.श्रीमती मेधा कुलकर्णी राज्यसभा सदस्य यांचे पत्र क्र.३७ दि.१२/४/२०२५ च्या अनुषंगाने सर्वसाधारण जिल्हा वार्षीक योजना २०२५-२६ खालील प्रस्तावित केलेल्या कामाचे अंदाजपत्रक सादर करणेबाबत नाहरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे. या पत्रामध्ये ओंकारेश्वर घाट शनिवार पेठ व ओंकारेश्वर मंदिर शनिवार पेठ येथे कामाच्या जागी पाहणी केली असता सदर ठिकाणी अनुसूचित जाती व जमातीची संख्या १५० पेक्षा जास्त आहे. सदरची कामे पुर्ण झाल्यानंतर त्याचा फायदा अनुसूचित जाती व जमातीच्या लोकांकरिता होणार आहे. असे दिले आहे. तसेच हे काम शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीच्या जागेवर असून कामाचे स्वरूप सार्वजनिक आहे. सदर जागेवर कोणतेही आरक्षण नाही तसेच सदर जागा कोणत्याही धार्मिक क्षेत्राशी/बाबीशी/संस्थेशी संबंधित नाही. या कामाकरिता पुणे महानगरपालिका पुणे यांचे मालकीची जागा उपलब्ध असून जागेबाबत आवश्यक अभिलेखे या सोबत सादर करण्यात येत आहे. प्रस्तावित काम हे शासकीय जागेवरच करण्यात येईल याबाबतची हमी देण्यात येत आहे. असे असताना यामध्ये ओंकारेश्वर घाट शनिवार पेठ व ओंकारेश्वर मंदीर शनिवार पेठ येथे नुतनीकरण करणे. (फरशी बसविणे, रंगकाम करणे, दगडी फुटपाथ बसविणे, शेड बांधणे, कंपाऊंड वॉल बांधणे, वॉलपेंटींग करणे, पाणीपुरवठा व्यवस्था, ड्रेनेज लाईन दुरूस्ती, समाधी स्थळ दुरूस्ती, नदीकाठ सुधारणा इत्यादी,) भाग-१-रक्कम रूपये ५० लाख असे एकूण पाच भाग करण्यात आले आहेत. या कामाची एकूण किंमत २ कोटी ५० लाख होत आहे. तसेच यामध्ये मा.खासदार महोदयांनी प्रस्तावित केलेली कामे यापुर्वी कोणत्याही योजनेतून घेण्यात आलेले नाही. तसेच हे काम राज्य/केंद्र/स्थानिक स्वराज्य संस्थेच्या इतर योजनेत प्रस्तावित/मंजूर केलेले नाही. सदरचे काम हे मूळ काम असून मोठ्या कामाचे तुकडे प्रस्तावित नाही अशी नोंद केलेली असताना कोणत्याही नियमाची अंमलबजावणी होताना दिसत नाही? या गंभीर घटनेची दखल घेवून पुणे महानगरपालिका आणि सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन काय कारवाई करणार याकडे पुणेकरांचे लक्ष लागले आहे.



लोकशाहीमध्ये नगरसेवक, आमदार, लोकसभा खासदार आणि राज्यसभा खासदार यांची भुमिका केवळ राजकीय प्रतिनीधी म्हणून नसते. आपल्या मतदारसंघातील नागरिकांच्या गरजा शासनापर्यंत पोहोचवणे, विकास कामांसाठी पाठपुरावा करणे आणि सार्वजनिक सुविधामध्ये सुधारणा घडवून आणने ही त्यांची महत्वाची जबाबदारी आहे. रस्ते, पाणीपुरवठा, गटारे, शाळा, आरोग्य सुविधा, उद्याने, सार्वजनिक स्वच्छतागृहे, सभागृह, प्रकाश योजना आणि इतर पायाभूत सुविधा यासाठी मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक निधी खर्च केला जातो. त्यामुळे प्रश्न असा आहे की, हा खर्च खरोखर जनहितासाठी होत आहे का, की जनहिताच्या नावाखाली अनावश्यक कामांना आर्थिक व्यवहाराचे स्वरूप प्राप्त होत आहे? अशी शंका निर्माण होत आहे.

- ज्येष्ठ नागरिक, रमेश वि.खामकर

ओंकारेश्वर घाट शनिवार पेठ व ओंकारेश्वर मंदिर शनिवार पेठ येथे अनुसूचित जाती व जमातीच्या लोकांकरिता या कामांचा नक्की काय फायदा होणार आहे. हा संशोधनाचा विषय आहे

- स्थानिक नागरिक

सदर कामे ही कोणत्याही धार्मिक क्षेत्राशी/बाबींशी/संस्थेशी संबंधित नाही असे म्हणतात मग नक्की हे काम कुठे चालू आहे. याची समक्ष पाहणी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी आणि पुणे महापालिकेचे अधिकारी यांनी केली आहे का हा प्रश्नच आहे.

- स्थानिक नागरिक

ज्या ठिकाणी काम चालू आहे तिथे कोणत्याही प्रकारचे नामफलक लावलेले दिसत नाही. अगोदरच काम केल्याने सर्व व्यवस्थीत आहे. तसेच १ ते १.५ वर्षाअगोदर याठिकाणी रंगरंगोटी करण्यात आली होती. मग पुन्हा याच ठिकाणी चांगल्या स्थितीत असलेले काम उकरून काढून नव्याने करण्याची गरज काय आहे. आणि यांना महानगरपालिका परवानगी कशी काय देते. हा प्रश्नच आहे.

- स्थानिक नागरिक

पुणे : दि.११/०९/२०२६ रोजी साधारण दुपारी १२:३० च्या दरम्यान पुणे महानगरपालिका प्रशासन मधिल संबंधीत अधिकारी यांना ज्येष्ठ नागरिक रमेश खामकर यांनी फोनवर संपर्क साधून सुव्यव्यथित असलेला पादचारी मार्ग कोठेही नादुरुस्त नसताना निष्कारण दुरुस्ती करित असलेले फोटोसह माहिती पाठविली असता. श्री.केतन जाधव कनिष्ठ अभियंता व श्री.राहूल तिखे उपअभियंता वि.क्षे.का. या अधिकाऱ्यांनी जागेवर जाऊन काम बंद केले. त्याबद्दल ज्येष्ठ नागरिक रमेश खामकर यांनी त्यांचे कौतुक करून आभार मानले. त्यानंतर दि.२३/९/२०२६ रोजी दुपारी २:४३ मिनीटांनी याच ठिकाणी मनपास गणपती विर्सजनाची गडबड तसेच शुक्रवार, शनिवार, रविवार सुट्टी साधुन परत तेथिल पादचारी मार्गस हिरवे कापड लावून उखडून टाकण्यांत आला. सदर जागेचे फोटो पुणे महानगरपालिकेचे पथ विभागाचे अधिक्षक अभियंता श्री.राजेश बनकर यांना पाठविले आहे. ते म्हणतात की, सदरचे काम हे मनपाचे नाही. परंतु ते काम आमदार निधी अथवा खासदार निधीतून होत असेल तर तो निधी पुणेकरांच्या टॅक्स रूपानेच जमा झालेल्यातून खर्च होत आहे. हे निश्चित! काम करित असताना विशेष तिथे कामे कोणाच्या सौजन्याने/सूपीक कल्पनेतून करण्यात येत आहे असा नामकरणचा फलक का नाही? त्या खर्चाचा, काम कोणता ठेकेदार करतोय त्याचे नाव फोन नं. का लावला नाही?

आमदार, खासदार निधीतून अशी कामे चोरून का केली जातात? अशा शंका मनात येते. कश्याची भिती वाटते? श्री राजेश बनकर साहेब आपण. पुणे शहराच्या पथ विभागाचे अधिक्षक अभियंता आहात. रस्ते, पादचारी मार्ग सुस्थिती असावे नव्हे हवे हि जबाबदारी आपली आहे. पुणेकरांची हि माफक अपेक्षा आहे कारण ते टॅक्स मनपात भरत आहे. सदर ठिकाणी त्वरित आपला एरवादा अधिकारी पाठवून, गैरकारभार त्वरित थांबवावा. हि पुणेकरांची माफक अपेक्षा असे दि.२४/९/२०२६ रोजी ऑनलाईन तक्रार केली. या तक्रारीचे सविस्तर माहिती ज्येष्ठ नागरिक रमेश खामकर यांनी सा.संघर्षाचा आवाजास दिल्यानंतर या कामाची माहिती घेतली असता असे निर्दशनास आले की, महाराष्ट्र शासन उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.३, पुणे, शिवकीर्ती, घोरपडी रोड, पुणे-४११००१ यांच्याकडून दि.३०/७/२०२५ रोजी मा.सहाय्यक आयुक्त, कसबा-विश्रामबागवाडा, क्षेत्रीय कार्यालय, पुणे महानगरपालिका पुणे यांना पत्रव्यवहार करण्यात आला आहे. याचा जावक क्र.साबां-३/स्वारगेट/१५८८/२०२५ असा आहे. यामध्ये सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना-२०२५-२६ खालील प्रस्तावित केलेल्या कामाचे अंदाजपत्रक सादर करणेबाबत. (पान २ वर)

संपादकीय...

निवडणूक आयोगावर प्रश्नचिन्ह असेल तर लोकशाहीवरील विश्वासाचे काय?

भारतीय लोकशाहीची खरी ताकद केवळ संसदेत, सरकारमध्ये किंवा राजकीय पक्षांमध्ये नाही; ती देशातील सामान्य मतदाराच्या मतदानाच्या अधिकारात आहे. हा अधिकार निष्पक्षपणे वापरता यावा आणि प्रत्येक मताला समान मूल्य मिळावे, यासाठी निवडणूक आयोग ही देशातील अत्यंत महत्त्वाची घटनात्मक संस्था आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेबाबत कोणताही प्रश्न निर्माण झाला तर तो केवळ एखाद्या व्यक्तीचा किंवा पक्षाचा प्रश्न राहत नाही; तो लोकशाहीच्या संस्थात्मक विश्वासाचा प्रश्न बनतो. अलीकडे Indian Express च्या पत्रकार रितिका चोप्रा यांच्या तपासणी अहवालांमुळे निवडणूक आयोगाच्या अंतर्गत निर्णयप्रक्रियेबाबत अनेक प्रश्न सार्वजनिक चर्चेत आले आहेत. विशेषतः निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांनी विविध निर्णयांवर लेखी आक्षेप घेतल्याचे वृत्त समोर आले आहे. Indian Express च्या अहवालानुसार, गेल्या दहा महिन्यांत अशा किमान १४ आक्षेपांची नोंद झाली. या वृत्तामुळे आयोगाच्या अंतर्गत मतभेदांपेक्षा मोठा प्रश्न समोर आला आहे-निर्णयप्रक्रिया किती पारदर्शक आहे आणि तीन सदस्यांच्या घटनात्मक संस्थेत प्रत्येक सदस्याची भूमिका किती प्रभावीपणे जपली जाते?

रितिका चोप्रांच्या अहवालामुळे नवा प्रश्न सप्टेंबर २०२६ मधील Indian Express च्या तपासणी अहवालानुसार, निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांनी मतदार नोंदणी, मतदारांची नावे वगळणे, SIR आणि मतदार माहिती प्रणालीशी संबंधित विविध बाबींवर लेखी आक्षेप नोंदवले. अहवालानुसार, काही निर्णय त्यांच्या माहितीशिवाय किंवा त्यांच्या आक्षेपाच्या विरोधात घेण्यात आल्याचा त्यांनी दावा केला. (The Indian Express) हा दावा स्वतंत्रपणे तपासला जाणे आवश्यक आहे. मात्र घटनात्मक संस्थेतील दोन सदस्यांनी वारंवार लेखी आक्षेप नोंदवले असल्याचे वृत्त समोर येणे हे सार्वजनिक चर्चेसाठी गंभीर बाब आहे. कारण निवडणूक आयोग हा सामान्य प्रशासकीय विभाग नाही. त्याच्याकडे संसद, विधानसभा, राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती यांच्या निवडणुकांचे घटनात्मक नियंत्रण आहे. आयोगाच्या स्वतःच्या माहितीनुसार तो एक कायमस्वरूपी घटनात्मक संस्था असून सध्या मुख्य निवडणूक आयुक्त आणि दोन निवडणूक आयुक्त असे तीन सदस्य आहेत आणि सर्व आयुक्तांना निर्णयप्रक्रियेत समान मताधिकार आहे. (Election Commission of India) म्हणूनच आठवण येते टी. एन. शेषन यांची या सगळ्या पार्श्वभूमीवर भारताचे माजी मुख्य निवडणूक आयुक्त टी. एन. शेषन यांची आठवण होणे स्वाभाविक आहे. शेषन यांनी १२ डिसेंबर १९९० ते ११ डिसेंबर १९९६ या काळात मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून काम केले. (Election Commission of India) त्यांच्या कार्यकाळाने भारतीय निवडणूक व्यवस्थेला वेगळे वळण दिले. निवडणुकीतील गैरप्रकारांवर कठोर कारवाई, आचारसंहितेची अंमलबजावणी, निवडणूक खर्चावरील मर्यादा, मतदार ओळखपत्राचा विस्तार आणि निवडणूक निरीक्षकांच्या भूमिकेला बळकटी देण्यासारख्या बाबींमध्ये त्यांच्या कार्यकाळाचा मोठा प्रभाव पडला. भारतीय निवडणूक आयोगाच्या स्वतःच्या इतिहासविषयक प्रकाशनातही शेषन यांनी आचारसंहितेची कठोर अंमलबजावणी आणि निवडणूक निरीक्षकांची भूमिका मजबूत केल्याचे नमूद आहे. टी. एन. शेषन यांची आठवण म्हणून एखाद्या व्यक्तीला पुन्हा शोधण्यापेक्षा त्यांच्या काळातील एक मूलभूत तत्त्व लक्षात ठेवणे अधिक आवश्यक आहे. निवडणूक आयोग मजबूत असेल तरच मतदाराचा विश्वास मजबूत राहतो. आज रितिका चोप्रांच्या तपासणी अहवालांनी उपस्थित केलेले प्रश्न असोत, २०२३ च्या मुख्य निवडणुक आयुक्त नियुक्ती कायद्यावरील न्यायालयीन प्रश्न असोत किंवा आयोगातील अंतर्गत मतभेदांचे वृत्त असो-या सर्वांचा अंतिम केंद्रबिंदू एकच आहे. भारतीय मतदाराला आपल्या मताचा अधिकार सुरक्षित, निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने वापरता येतो याची खात्री कोण देणार? याचे उत्तर कोणत्याही राजकीय पक्षाने नव्हे, तर घटनात्मक संस्था, पारदर्शक प्रक्रिया, न्यायालयीन देखरेख आणि सार्वजनिक उत्तरदायित्व यांनी द्यायला हवे.

लोकशाहीत सरकारे बदलतात, राजकीय पक्ष बदलतात, निवडणूक आयुक्त बदलतात; पण मतदाराचा अधिकार आणि निवडणूक प्रक्रियेवरील सार्वजनिक विश्वास कायम राहिला पाहिजे. हाच टी. एन. शेषन यांच्या काळाकडून आजच्या पिढीने घेण्यासारखा सर्वात महत्त्वाचा संस्थात्मक धडा आहे.


साप्ताहिक संघर्षाचा आवाज मालक – यशोदा उत्तरेश्वर सोनवणे, यांनी सा. संघर्षाचा आवाज संपादक, मुद्रक, प्रकाशक संजय सोनवणे यांना सर्व अधिकार दिले आहे. त्यांनी श्री साई ग्राफिक्स, डी. एस. के. चिंतामणी कॉम्प्लेक्स. विंग – सी – २, शॉप नं. ३८, शनिवार पेठ, पुणे – ४११०३० येथे छापून सर्व्हे नं. ८, नेताजीनगर, येरवडा, पुणे – ४११००६ येथून प्रकाशित केले.

Yashoda Uttareshwar Sonwane, the owner of Weekly Sangharshacha Aawaz, has given all rights to the Sanjay Uttareshwar Sonwane, editor, printer, publisher of Weekly Sangharshacha Aawaz. This weekly is printed at Shri Sai Graphics, D. S. K. Chintamani Complex, Wing C-2, Shop No. 38, Shaniwar Peth, Pune - 411030 and published at Survey No. 8 Netajinagar, Yerawada, Pune - 411006.

या साप्ताहिकात प्रसिध्द झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयांतर्गत सोडवली जातील अन्यत्र कोठेही नाही.

आपल्या प्रतिक्रिया येथे नोंदवाव्यात
Email : sangharshachaaawaz22@gmail.com
Email : sangharshachaaawaz@rediffmail.com
Mob. : 7276871008 / 9665487134



मागील अंकावरून

दुसऱ्याचे नुकसान करण्याची इच्छा धरणारे, वाईट मित्र, सोबती ही सहा कारणे मनुष्याच्या सत्यानाशास कारणीभूत ठरतात.

ज्याचे मित्र व सहयोगी, सोबती जर पापानी बरबटले असतील तर तो दोन्ही जगात नष्ट-भ्रष्ट होईल. या लोकात व परलोकात देखील जुगार, परनारीगमन, दारू, नाच, गाणे, दिवसभर झोप. अनेक गल्ली बोळांत फिरणे, वाईटाची संगत, परकोटीचा लोभ अशा एकूण नऊ कारणांनी मनुष्य बरबाद होतो. नेस्तनाबूत होतो.

जो जुगार खेळतो, जो नशापाणी करतो, परस्त्रीशी अनैतिक संबंध ठेवतो. जो नीच लोकांची संगत करतो, ज्ञानी लोकांची संगत करित नाही, त्यांचा सहवास टाळतो त्याची अधोगती होते. जशी कृष्ण पक्षातील चंद्राची कला. **क्रमशः**

सिगोलवाद सुत्त

मला उपलब्ध वाङमयाद्वारे धर्मासंबंधी जे ज्ञान प्राप्त झाले. त्याचे सर्वासाठी विवरण करावे असे वाटले आणि धम्मप्रचाराच्या कामास सुरूवात करावी असे वाटले. विचार मनाना भावला लिखाणाचे अंग नोकरीत असल्यापासून आहे, धम्मासंबंधी मला पटलेल्या लहान विषयावर आधारित बाबी पुस्तकरूपाने समाजास देणे ही योजना आहे. भगवंताच्या सुत्तातील अर्थ मला समजला तसा मी मांडला आहे, अर्थात माझ्या आचरणाला धर्म मी सांगतोय. मला लेखक व्हायचे नाही. धम्माच्या आचरणाद्वारा प्रचार करावयाचा आहे. त्यासाठी माझ्या बुध्दीनुसार, आकलनानुसार मी प्रयत्न करण्याचे धाडस केले आहे व ते पुढेही चालू ठेवणार आहे. प्रोत्साहन मिळाल्यास माझाही हुरूप वाढेल व पुढील काम विनाविलंबाने करीन.

जयभीम!

उत्तमराव सोनवणे

अनुसूचित जाती व जमातीच्या लोकांना फायदा होणार आणि कोणत्याही धार्मिक क्षेत्राशी काम संबंधित नाही म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाची करोडो रूपयांची कामे जोरात

(पान १ वरून) नाहरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत म्हणून संदर्भ- १) मा. सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे

पत्र जा.क्र. ओ/२०२५/जुलै/इसीएल/०१४६७, ०१४६६,०१४६५, ०१४६४,०१४६३ दि.१/७/२०२५

२) मा. खा. श्रीम. मेधा कुलकणी राज्यसभा सदस्य यांचे पत्र क्र.३७ दि.१२/४/२०२५

मा.खा. श्रीम. मेधा कुलकणी राज्यसभा सदस्य यांनी सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना - २०२५-२६ अंतर्गत सन २०२५-२६ करीता खालील कामे सुचविली आहेत. उपरोक्त संदर्भीय पत्रातील सुचनेनुसार सदर कामांची अंदाजपत्रके प्रशासकीय मान्यतेकरीता मा.जिल्हाधिकारी पुणे यांना सादर करावयाची आहेत. प्रशासकीय मान्यतेकरीता खालील प्रमाणे मुद्दे निहाय आपले नाहरकतीची आवश्यकता आहे. १ मा. खासदार महोदयांनी प्रस्तावित केलेली कामे सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे या अभिकरणामार्फत घेण्यात येत आहे, २ सदरील कामे पूर्ण झाल्यावर (दोष दायित्व कालावधी पूर्ण झाल्यावर) कामाची देखभाल दुरुस्ती/परिरक्षण करण्यास पुणे महानगरपालिका हे अभिकरण तयार आहे, ३.खालील कामांच्या जागा पाहणी केली असता सदर ठिकाणी अनुसूचित जाती व जमातींची संख्या १५० पेक्षा जास्त आहे. सदरची कामे पुर्ण झाल्यानंतर त्याचा फायदा अनुसूचित जाती व जमातीच्या लोकांकरीता होणार आहे, ४ हे काम करण्यास या कार्यालयाची कुठलीही हरकत नाही, ५ हे काम शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीच्या जागेवर असून कामाचे स्वरुप सार्वजनिक आहे. सदर जागेवर कोणतेही आरक्षण नाही तसेच सदर जागा कोणत्याही धार्मिक क्षेत्राशी/बाबीशी/संस्थेशी संबंधीत नाही. या कामाकरीता पुणे महानगरपालिका पुणे यांचे मालकीची जागा उपलब्ध असून जागेबाबत आवश्यक अभिलेखे या सोबत सादर करण्यात येत आहे. प्रस्तावित काम हे शासकीय जागेवरच करण्यात येईल याबाबतची हमी देण्यात येत आहे, ६.मा. खासदार महोदयांनी प्रस्तावित केलेली कामे यापुर्वी कोणत्याही योजनेतून घेण्यात आलेले नाही. तसेच हे काम राज्य/केंद्र/स्थानिक स्वराज्य संस्थेच्या इतर योजनेत प्रस्तावित/मंजूर केलेले नाही. सदरचे काम हे मूळ काम असून मोठया कामाचे तुकडे प्रस्तावित नाही, ७.सदरचे कामे पूर्ण झाल्यावर तयार होणारी मालमत्ता ताब्यात घेऊन त्याची नोंद योग्य त्या नोंदवहीत घेण्यात येईल.

सदरील कामे पूर्ण झाल्यानंतर दोष दायित्व कालवधी पूर्ण झालेनंतर कामे आपले कार्यालयास हस्तांतरण करण्यात येतील तरी सोबत जोडलेल्या प्रमाणे प्रमाणपत्र आपले मार्फत मिळावे ही विनंती म्हणून पुढे कामाची यादी दिली. यामध्ये १) ओंकारेश्वर घाट शनिवार पेठ व ओंकारेश्वर मंदीर शनिवार पेठ येथे नुतनीकरण करणे. (फरशी बसविणे, रंगकाम करणे, दगडी फुटपाथ बसविणे, शेड बांधणे, कंपाऊंड वॉल बांधणे, वॉलपेंटींग करणे, पाणीपुरवठा व्यवस्था, ड्रेनेज लाईन दुरूस्ती, समाधी स्थळ दुरूस्ती, नदीकाठ सुधारणा इत्यादी,) भाग-१-रक्कम रूपये ५० लाख, २) ओंकारेश्वर घाट शनिवार पेठ व ओंकारेश्वर मंदीर शनिवार पेठ येथे नुतनीकरण करणे, (फरशी बसविणे, रंगकाम करणे, दगडी फुटपाथ बसविणे, शेड बांधणे, कंपाऊंड वॉल बांधणे, वॉलपेंटींग करणे, पाणीपुरवठा व्यवस्था, ड्रेनेज लाईन दुरूस्ती, समाधी स्थळ दुरूस्ती, नदीकाठ सुधारणा इत्यादी) भाग-२,-रक्कम रूपये ५० लाख, ३) ओंकारेश्वर घाट शनिवार पेठ व ओंकारेश्वर मंदीर शनिवार पेठ येथे नुतनीकरण करणे, (फरशी बसविणे, रंगकाम करणे, दगडी फुटपाथ बसविणे, शेड बांधणे, कंपाऊंड वॉल बांधणे, वॉलपेंटींग करणे, पाणीपुरवठा व्यवस्था, ड्रेनेज लाईन दुरूस्ती, समाधी स्थळ दुरूस्ती, नदीकाठ सुधारणा इत्यादी) भाग-३,-रक्कम रूपये ५० लाख, ४) ओंकारेश्वर घाट शनिवार पेठ व ओंकारेश्वर मंदीर शनिवार पेठ येथे नुतनीकरण करणे, (फरशी बसविणे, रंगकाम करणे, दगडी फुटपाथ बसविणे, शेड बांधणे, कंपाऊंड वॉल बांधणे, वॉलपेंटींग करणे, पाणीपुरवठा व्यवस्था, ड्रेनेज लाईन दुरूस्ती, समाधी स्थळ दुरूस्ती, नदीकाठ सुधारणा इत्यादी) भाग-४,-रक्कम रूपये ५० लाख, ५) ओंकारेश्वर घाट शनिवार पेठ व ओंकारेश्वर मंदीर शनिवार पेठ येथे नुतनीकरण करणे, (फरशी बसविणे, रंगकाम करणे, दगडी फुटपाथ बसविणे, शेड बांधणे, कंपाऊंड वॉल बांधणे, वॉलपेंटींग करणे, पाणीपुरवठा व्यवस्था, ड्रेनेज लाईन दुरूस्ती, समाधी स्थळ दुरूस्ती, नदीकाठ सुधारणा इत्यादी) भाग-५,-रक्कम रूपये ५० लाख

सदर प्रकरणी लवकर कार्यवाही व्हावी ही विनंती असे उपविभागीय अभियंता, सा.बां.उपविभाग क्र.३, पुणे-१ म्हणतात. यावर सहाय्यक आयुक्त कसबा-विश्रामबागवाडा क्षेत्रीय कार्यालय, पुणे महानगरपालिका पुणे यांनी जावक क्रमांक ३३६८, दिनांक २/७/२०२५ रोजी प्रमाणपत्र देण्यात आले. यामध्ये ते म्हणतात की, सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना-२०२५-२६ अंतर्गत सन २०२५-२६ करीता मा.खा.श्रीम.मेधा कुलकर्णी राज्यसभा सदस्य यांनी खालील कामे सुचविली आहेत.

१) ओंकारेश्वर घाट शनिवार पेठ व ओंकारेश्वर मंदीर शनिवार पेठ येथे नुतनीकरण करणे. (फरशी बसविणे, रंगकाम करणे, दगडी फुटपाथ बसविणे, शेड बांधणे, कंपाऊंड वॉल बांधणे, वॉलपेंटींग करणे, पाणीपुरवठा व्यवस्था, ड्रेनेज लाईन दुरूस्ती, समाधी स्थळ दुरूस्ती, नदीकाठ सुधारणा इत्यादी,) भाग-१-रक्कम रूपये ५० लाख

२) ओंकारेश्वर घाट शनिवार पेठ व ओंकारेश्वर मंदीर शनिवार पेठ येथे नुतनीकरण करणे, (फरशी बसविणे, रंगकाम करणे, दगडी फुटपाथ बसविणे, शेड बांधणे, कंपाऊंड वॉल बांधणे, वॉलपेंटींग करणे, पाणीपुरवठा व्यवस्था, ड्रेनेज लाईन दुरूस्ती, समाधी स्थळ दुरूस्ती, नदीकाठ सुधारणा इत्यादी) भाग-२,-रक्कम रूपये ५० लाख

३) ओंकारेश्वर घाट शनिवार पेठ व ओंकारेश्वर मंदीर शनिवार पेठ येथे नुतनीकरण करणे, (फरशी बसविणे, रंगकाम करणे, दगडी फुटपाथ बसविणे, शेड बांधणे, कंपाऊंड वॉल बांधणे, वॉलपेंटींग करणे, पाणीपुरवठा व्यवस्था, ड्रेनेज लाईन दुरूस्ती, समाधी स्थळ दुरूस्ती, नदीकाठ सुधारणा इत्यादी) भाग-३,-रक्कम रूपये ५० लाख

४) ओंकारेश्वर घाट शनिवार पेठ व (पान ३ वर)

केंद्रीय निवडणूक आयोग भारत सरकारचा निवडणूक आयोग झालाय का?
ॲड. प्रकाश आंबेडकरांचा निवडणूक आयोगावर निशाणा!

पुणे : महाराष्ट्रातील मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षणाच्या (SIR) प्रक्रियेवरून वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी निवडणूक आयोगावर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. महाराष्ट्रात सुमारे २ कोटी ९० लाख मतं डिलीट केली जातात आणि त्याचवेळी ६० लाख मतांची डिशन केली जातील, हे आम्ही एप्रिल २०२६ मध्ये पत्रकार परिषद घेऊन जाहीर केले होते. तसेच आज घडले आहे. याचा त्यांनी पुनरुच्चार केला.

आम्ही वंचित बहुजन आघाडीच्या वतीने SIR संदर्भातील अधिसूचना, पत्रव्यवहार आणि कायदेशीर तरतुदी सार्वजनिक करण्याचे पत्र देऊन ही आमची मागणी महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी चोक्कलिंगम यांनी नाकारली. त्यांच्याकडून अद्याप उत्तर मिळालेले नाही, असेही त्यांनी सांगितले.

आंबेडकर म्हणाले की, महाराष्ट्रात SIR जाहीर झाल्यानंतर त्यांनी मुख्य निवडणूक अधिकारी चोकलिंगम यांना पत्र लिहून या प्रक्रिये संदर्भातील अधिसूचना आणि झालेला पत्रव्यवहार सर्व राजकीय पक्षांना उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. मात्र, या पत्राला अद्याप उत्तर देण्यात आलेले नाही. याच संदर्भात मुंबई



उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

Representation of the People Act मधील कलम २१(३) चा संदर्भ देत आंबेडकर यांनी SIR करण्याच्या अधिकाराबाबत प्रश्न उपस्थित केला. मतदारसंघ किंवा मतदारसंघातील काही भागापुरतेच अशा प्रकारचे पुनरिक्षण करता येते आणि त्यासाठी संसदेकडून करण्यात आलेल्या नियमांनुसार अधिसूचना काढणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. दुर्दैवाने हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश हे घटनेशी आणि कायद्याशी पूर्णपणे इमानदार नाहीत. असेही ते म्हणाले.

या विषयावर 'इंडियन एक्स्प्रेस'ने वृत्त प्रकाशित केल्यानंतर राजकीय पक्षांकडून आंदोलने सुरू झाली. वर्तमानपत्रात बातमी आल्यानंतर लोक प्रश्न विचारतील म्हणून आंदोलनं सुरू झाली आहेत. ही राजकीय पक्षांची नौटंकी आहे, असे ते म्हणाले. मतदार यादीतून नागरिकांची नावे वगळण्याच्या प्रक्रियेवरही ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी आक्षेप घेतला. नागरिकत्वाचा प्रश्न ठरविण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला नसून त्यासाठी नागरिकत्व कायद्यानुसार सक्षम यंत्रणेकडून निर्णय होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

'शेजारी सापडला नाही, अमुक व्यक्ती येथे राहत नाही, अशी कारणे देऊन महाराष्ट्रातील दोन कोटींपेक्षा अधिक नावे वगळण्यासाठी काढण्यात आली आहेत. एखाद्या मतदाराचे नाव यादीतून वगळायचे असल्यास त्याविरोधात अर्ज किंवा तक्रार असणे आवश्यक आहे. सक्षम अधिकाऱ्यांच्या समितीने निर्णय घेतल्याशिवाय नाव वगळता येत नाही,' असा दावा त्यांनी केला.

बिहारमधील SIR संदर्भातील सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेचा दाखला देत महाराष्ट्रातील SIR विरोधातील याचिका तातडीने सुनावणीस घ्यावी, अशी विनंती उच्च न्यायालयाला करणार असल्याचेही ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले.

निवडणूक प्रक्रियेतील अनियमिततेविरोधात विरोधी पक्षांनी एकत्र येण्याची गरज असल्याचे ॲड. प्रकाश आंबेडकर म्हणाले. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली केवळ एका पक्षाच्यावतीने आंदोलन करण्याऐवजी सर्व विरोधी पक्षांना एकत्र घेऊन आंदोलन का केले जात नाही?, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. निवडणूक प्रक्रियेतील धांदलीविरोधात सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येऊन या मुद्द्याला व्यापक स्वरूप देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

निवडणूक आयोगाच्या भूमिकेबाबत बोलताना आंबेडकर यांनी सर्वोच्च न्यायालयातील "Election Commission of India v. Sivan Pillai' आणि "Election Commission of India v. Ashok Kumar' यांसारख्या निवडणूकविषयक न्याय निवाड्यांच्या संदर्भात व्यापक घटनात्मक प्रश्न उपस्थित केले. निवडणूक व्यवस्थेवर सतत देखरेख आणि दक्षता आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

'देशाचे सार्वभौमत्व वाचवायचे असेल तर जनतेने सहभागी व्हावे'

देशातील सध्याच्या राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना आंबेडकर यांनी 'कॉर्पोरेट रुल'चा धोका असल्याचा दावा केला. देशातील सत्ता आणि निर्णयप्रक्रियेवर कॉर्पोरेट क्षेत्राचा प्रभाव वाढत असल्याचे ते म्हणाले.

'आंदोलन कोणत्या पक्षाने सुरू केले आहे, यापेक्षा ते यशस्वी कसे होईल याकडे सर्वांनी लक्ष दिले पाहिजे. केवळ लक्ष न देता या आंदोलनात सहभागी झाले पाहिजे,' असे आवाहन त्यांनी जनतेला केले. 'या देशाची एकता आणि सार्वभौमत्व वाचवायचे असेल तर भारतीय जनतेने स्वतः पुढाकार घेण्याची गरज आहे. शिवाजी महाराज शेजारच्या घरात जन्माला यावेत, अशी भूमिका न घेता शिवाजी महाराज माझ्याच घरात जन्मतील आणि मीच आंदोलन करणार अशी भूमिका जनतेने घेतली पाहिजे,' असे आवाहन ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केले.

MPSC विद्यार्थ्यांचे २ ऑक्टोबरपासून पुण्यात बेमुदत धरणे आंदोलन; रोहित पवार आणि डॉ. विश्वजीत कदम यांचा सहभाग

पुणे : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) विद्यार्थ्यांच्या प्रलंबित मागण्यांसह विद्यमान अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्यासाठीचे बहुचर्चित बेमुदत धरणे आंदोलन २ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजल्यापासून एस. एम. जोशी पूल, नवी पेठ येथे सुरू होणार आहे. नुकतेच पुणे यांच्या समवेत आमदार रोहित पवार यांच्या उपस्थितीत विद्यार्थी प्रतिनिधींची एक संयुक्त बैठक पार पडली. या बैठकीमध्ये तांत्रिक कारणांमुळे २७ सप्टेंबर रोजी होणाऱ्या आंदोलनाला परवानगी देता येत नसली, तरी २ ऑक्टोबर रोजी (गांधी जयंती) मात्र आंदोलनास परवानगी देण्याबाबत पोलिसांनी सहमती दर्शविली आहे.

अध्यक्षांच्या राजीनाम्यासाठी विद्यार्थी आक्रमक; मुख्यमंत्र्यांसोबत बैठक

MPSC विद्यार्थ्यांनी यापूर्वी केलेल्या आंदोलनाद्वारे आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी केली होती. त्या वेळी त्यांचा कार्यकाळ आताच सुरू झाला असल्याने राजीनामा देता येणार नाही, अशी भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली होती. परंतु, अलीकडच्या कालावधीमध्ये विवेक भीमनवार यांच्या कारकिर्दीत काही पेपर फुटीची प्रकरणे समोर आल्यामुळे विद्यार्थी पूर्णतः आक्रमक झाले आहेत. अध्यक्षांच्या राजीनाम्याशिवाय आता आंदोलनातून माघार घेतली जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका विद्यार्थ्यांनी घेतली आहे. दरम्यान,



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत येत्या दोन दिवसांमध्ये MPSC विद्यार्थी आंदोलकांची एक संयुक्त बैठक होणार असून यात विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्यासह इतर तीन प्रमुख मागण्या ठेवण्यात आल्या आहेत.

हे आंदोलन पूर्णतः अराजकीय, विद्यार्थ्यांसाठी सर्व पातळ्यांवर संघर्ष करणार: रोहित पवार

या आंदोलनाला आमदार रोहित पवार यांनी पूर्ण पाठिंबा दिला आहे. रोहित पवार म्हणाले, सदर आंदोलन हे पूर्णतः अराजकीय स्वरूपाचे असून केवळ विद्यार्थी हिताचे असल्याने यामध्ये आपण सहभागी आहोत. विद्यार्थ्यांना न्याय मिळणे, परीक्षांची पेपरफुटी थांबणे या प्रमुख विषयांसाठी आपण विद्यार्थ्यांसाठी सर्व पातळ्यांवर संघर्ष करण्यास तयार आहोत. मुख्यमंत्र्यांनी यात वेळीच लक्ष घालून विवेक भीमनवार यांचा राजीनामा घेणे हेच योग्य ठरेल.

गरज पडल्यास राहुल गांधीही आंदोलनात उपस्थित राहणार : डॉ. विश्वजीत कदम म्हणाले एमपीएससी विद्यार्थ्यांना न्याय मिळावा अशी भूमिका काँग्रेस पक्षाची असून या आंदोलनाला काँग्रेसनेही मोठी ताकद दिली आहे. माजी मंत्री व काँग्रेसचे नेते डॉ. विश्वजीत कदम यांनी सांगितले की, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी एमपीएससी विद्यार्थ्यांशी यापूर्वीच संवाद साधलेला असून त्यांच्या मागण्या सोडवण्या संदर्भामध्ये ते आग्रही आहेत. या आंदोलनामध्ये मी स्वतः पक्ष पातळीवर सहभागी होणार असून गरज पडल्यास राहुल गांधी हे देखील आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी पुण्यात उपस्थित राहतील.

आज पोलीस आयुक्तांसोबत झालेल्या बैठकीला विद्यार्थी प्रतिनिधी व विविध पक्षीय नेते उपस्थित होते. यामध्ये काँग्रेस पक्षाचे युवक प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे , रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे राहुल डंबाळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे रविकांत वरपे, माजी नगरसेवक तथा शहराध्यक्ष श्रीकांत पाटील, सुनील माने , प्रथमेश अबनावे यांच्यासह आंदोलकांचे प्रमुख आयोजक व विद्यार्थी प्रतिनिधी अक्षय कांबळे, प्रमोद पाटील, विश्वजीत जाधव, संग्राम नरळे, किरण जगताप, सिद्धांत जांभुळकर, नितीन गीते, नितीन आंधळे, अजिनाथ केदार तसेच आणि आदी मान्यवर उपस्थित होते.

अनुसूचित जाती व जमातीच्या लोकांना फायदा होणार आणि कोणत्याही धार्मिक क्षेत्राशी काम संबंधित नाही म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाची करोडो रुपयांची कामे जोरात

(पान २ वरून) ओंकारेश्वर मंदीर शनिवार पेठ येथे नुतनीकरण करणे, (फरशी बसविणे, रंगकाम करणे, दगडी फुटपाथ बसविणे, शेड बांधणे, कंपाऊंड वॉल बांधणे, वॉलपेंटींग करणे, पाणीपुरवठा व्यवस्था, ड्रेनेज लाईन दुरूस्ती, समाधी स्थळ दुरूस्ती, नदीकाठ सुधारणा इत्यादी) भाग-४,-रक्कम रूपये ५० लाख

५) ओंकारेश्वर घाट शनिवार पेठ व ओंकारेश्वर मंदीर शनिवार पेठ येथे नुतनीकरण करणे, (फरशी बसविणे, रंगकाम करणे, दगडी फुटपाथ बसविणे, शेड बांधणे, कंपाऊंड वॉल बांधणे, वॉलपेंटींग करणे, पाणीपुरवठा व्यवस्था, ड्रेनेज लाईन दुरूस्ती, समाधी स्थळ दुरूस्ती, नदीकाठ सुधारणा इत्यादी) भाग-५,-रक्कम रूपये ५० लाख

सदर प्रकरणी लवकर कार्यवाही व्हावी ही विनंती. उपविभागीय अभियंता, सा.बां.उपविभाग क्र.३, पुणे-१

१) खासदार महोदयांनी प्रस्तावित केलेली कामे सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे या अभिकरणामार्फत घेण्यात येत आहे.

२) सदरील कामे पूर्ण झाल्यावर (दोष दायित्व कालावधी पूर्ण झाल्यावर) कामाची देखभाल दुरूस्ती/परिरक्षण करण्यास पुणे महानगरपालिका हे अभिकरण तयार आहे.

३) हे काम करण्यास या कार्यालयाची कुठलीही हरकत नाही.

४) हे काम शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीच्या जागेवर असून कामाचे स्वरूप सार्वजनिक आहे. सदर जागेवर कोणतेही आरक्षण नाही तसेच सदर जागा कोणत्याही धार्मिक क्षेत्राशी/बाबीशी/संस्थेशी संबंधित नाही. या कामाकरिता पुणे महानगरपालिका पुणे यांचे मालकीची जागा उपलब्ध असून जागेबाबत आवश्यक अभिलेखे या सोबत सादर करण्यात येत आहे. प्रस्तावित काम हे शासकीय जागेवरच करण्यात येईल याबाबतची हमी देण्यात येत आहे.

५) खासदार महोदयांनी प्रस्तावित केलेली कामे यापुर्वी कोणत्याही योजनेतून घेण्यात आलेले नाही. तसेच हे काम राज्य/केंद्र/स्थानिक स्वराज्य संस्थेच्या इतर योजनेत प्रस्तावित/मंजूर केलेल नाही. सदरचे काम हे मूळ काम असून मोठ्या कामाचे तुकडे प्रस्तावित नाही.

६) सदरचे कामे पूर्ण झाल्यावर तयार होणारी मालमत्ता ताब्यात घेऊन त्याची नोंद योग्य त्या नोंदवहीत घेण्यात येईल. असे महापालिका सहाय्यक आयुक्त कसबा-विश्रामबागवाडा क्षेत्रीय कार्यालय, पुणे महानगरपालिका यांनी म्हटले आहे.

नियमित वाचा...
सा. संघर्षाचा आवाज

दुष्काळावर मात करण्यासाठी एकजूटीने प्रयत्न – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा निर्धार

राज्यातील २६५ तालुक्यात दुष्काळ जाहीर, बारा उपाययोजना व सवलती लागू; पाणी, चारा, रोजगार, अन्नधान्याची व्यवस्था बळकट होणार

मुंबई : 'दुष्काळी परिस्थितीत राज्यातील शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी आमच्या मदतीच्या केंद्रस्थानी आहे. त्यांना दिलासा देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जाणार आहेत. आम्ही शेतकरी बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. या आव्हानावर मात करण्यासाठी आपण सर्व एकजूटीने प्रयत्न करूया, असा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती आहे. या तालुक्यांतील शेतकरी, विद्यार्थी, शेतमजूर, नागरिक आणि पशुधनाला दिलासा देण्यासाठी बारा उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.



याबाबतचा शासन निर्णय जाहीर झाल्यानंतर मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी या तालुक्यांमधील परिस्थितीबाबत तत्काळ पंचनामे सुरु करावेत असे निर्देश संबंधित जिल्हाधिकारी यांना दिले आहेत.

'पावसाअभावी शेतकऱ्यांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. दुष्काळी परिस्थिती जाहीर झालेल्या तालुक्यांमध्ये तत्काळ सर्व्हेक्षण करावे लागणार आहे. यासाठी महसूल विभाग, कृषि तसेच संबंधित सर्व यंत्रणांनी संवेदनशीलतेने आणि समन्वयाने काम करावे. त्यासाठी क्षेत्रीयस्तरावर सुसंवाद आणि संपर्क ठेवावा. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी या कामाला प्राधान्य द्यावे, असे निर्देशही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी दिले आहेत. सर्व्हेक्षण करताना पिकांची स्थिती दर्शवणारे छायाचित्रे व जीपीएस कोऑर्डीनेटद्वारे पिक परिस्थितीचा अहवाल सादर केला जाणार आहे.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी नुकताच राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी दौरा केला. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केली. शेतकरी बांधवांशी आस्थेवाईक संवाद साधला. त्यांच्या अडी-अडचणी समजून घेतल्या. दुष्काळी परिस्थितीबाबत तातडीने निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासित केले होते. त्या अनुषंगाने आज दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करण्याबाबत शासन निर्णय जाहीर करण्यात आला.

राज्याचे कृषि आयुक्त यांनी खरीप २०२६ च्या हंगामाचा आढावा घेऊन राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती असल्याचा अहवाल सादर केला. त्यामुळे आता या

राज्यातील तालुक्यामध्ये जून ते आज पर्यंत या कालावधीतील पर्जन्याची तूट व अन्य घटकांनी प्रभावित झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थितीबाबत दुष्काळाबाबतच्या Trigger- १ (प्रथम कळ) अनुषंगाने पंचनामे करण्यात येणार आहेत. सर्व्हेक्षण केलेल्या क्षेत्रातील पिकांची स्थिती दर्शवणारे छायाचित्र व जीपीएस कोऑर्डीनेट संकलन करून पिक परिस्थितीचा अहवाल तयार करण्यात येणार आहे.

दुष्काळग्रस्त भागात विशेष बाब म्हणून उपाययोजना व सवलती लागू करण्यात येणार आहेत. त्यामध्ये जमीन महसूलात सूट, पिक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती, कृषी पंपाच्या चालू विजबिलात सूट (७.५ हॉर्सपावर पर्यंत क्षमतेच्या विजपंपाचे वीज बिल अगोदरच माफ करण्यात आले आहे. त्यावरील वीज पंपांना सदर सूट लागू असेल), शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी, रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात शिथिलता आणून जास्तीत जास्त कामे सुरु करणे, आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर, टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतक-यांच्या शेतीच्या पंपाची वीज खंडीत केली जाणार नाही, शेतीवर अवलंबून शेतकरी, शेतमजूर यांच्यासाठी अन्न धान्याचा पुरेसा पुरवठा, टंवाई होणार नाही याबाबत व्यवस्था उभी करणे, जनावरांना आवश्यक चारा उपलब्ध होईल याची व्यवस्था करणे, जलसंधारणाची कामे सुरु करणे, अगोदरच निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णयाप्रमाणे पिण्याचे पाणी आणि जनावरांसाठी पाण्याचे नियोजन करणे या उपाययोजनांचा समावेश आहे.

सहा महसूल विभागांतील २६५ तालुक्यांचा समावेश

'ट्रिगर-१' लागू झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये राज्यातील विविध महसूल विभागांतील तालुक्यांचा समावेश आहे. ठाणे महसूल विभागातील १२, नाशिक विभागातील ४९, पुणे विभागातील ३५, छत्रपती संभाजीनगर विभागातील ७४, अमरावती विभागातील ५६ आणि नागपूर विभागातील ३९ तालुक्यांचा यामध्ये समावेश आहे.

ठाणे महसूल विभागातील रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन, रत्नागिरी जिल्ह्यातील रत्नागिरी, संगमेश्वर व राजापूर तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी, दोडामार्ग, कणकवली, कुडाळ, वैभववाडी, मालवण, देवगड व वेंगुर्ला या तालुक्यांना प्रथम कळ लागू झाली आहे. ठाणे व पालघर जिल्ह्यातील कोणत्याही तालुक्याचा यामध्ये समावेश नाही.

नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार आणि अहिल्यानगर जिल्ह्यांतील एकूण ४९ तालुक्यांचा, तर पुणे, सोलापूर, सांगली, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यांतील ३५ तालुक्यांचा समावेश आहे.

छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी आणि हिंगोली या जिल्ह्यांतील ७४ तालुक्यांना प्रथम कळ लागू झाली आहे. अमरावती विभागातील बुलढाणा, अमरावती, अकोला, वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्यांतील ५६ तालुक्यांचा, तर नागपूर विभागातील वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांतील ३९ तालुक्यांचा समावेश आहे.

पीक नुकसानीच्या मदतीसाठी स्वतंत्र निर्णय

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांच्या नुकसानीबाबत विहित कार्यपद्धतीची पूर्तता झाल्यानंतर स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे मदत जाहीर करण्यात येणार आहे. त्यामुळे पंचनामे व पीक परिस्थितीचे अचूक सर्वेक्षण करण्याच्या प्रक्रियेला शासनाने विशेष महत्त्व दिले आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी, विद्यार्थी, मजूर आणि सर्वसामान्य नागरिकांना आवश्यक त्या सवलती व सुविधा वेळेत उपलब्ध करून देत दुष्काळी परिस्थितीचा परिणाम कमी करण्यासाठी शासनाने विविध पातळ्यांवर उपाययोजना सुरू केल्या आहेत.

फुरसुंगी नगरसेवकांच्या चौकशीचे आदेश

खोट्या शपथपत्रांमुळे पद धोक्यात; जिल्हाधिकाऱ्यांकडून गंभीर दखल

फुरसुंगी : नगर परिषद निवडणुकीत उमेदवारी अर्जासोबत खोटे शपथपत्र दाखल केल्याच्या तक्रारीची जिल्हाधिकारी कार्यालयाने गंभीर दखल घेतली आहे. याप्रकरणी संबंधित उमेदवारांची सखोल चौकशी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी कार्यालयाकडून फुरसुंगी नगरपरिषदेला देण्यात आले आहेत. या कारवाईमुळे दोषी आढळल्यास नगरसेवकांचे पद रद्द होणार का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

फुरसुंगी नगरपरिषदेची निवडणूक होऊन राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता स्थापन झाली असनू, नऊ महिन्यांचा कालावधी पूर्ण झाला आहे. मात्र, निवडणुकीत उमेदवारी मिळविण्यासाठी काही नगरसेवकांनी अर्जासोबत खोटी शपथपत्रे जोडल्याची तक्रारी स्थानिक रहिवासी नितीन गायकवाड यांनी राज्य निवडणूक आयोगाकडे केली होती. या तक्रार अर्जावर आता प्रत्यक्ष कारवाईला सुरूवात झाली आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार, जिल्हाधिकारी कार्यालयाने नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. या चौकशीचा सविस्तर अहवाल सात दिवसांच्या आत सादर करावा असे पत्रात नमूद करण्यात आले आहे. गायकवाड यांनी केलेल्या तक्रारीनुसार, मिळकतकर थकबाकी असतानाही थकबाकी नसल्याचा दाखला सादर करणे, स्वत:चे घर असतानाही घर नसल्याचे भासवणे, एका नगरसेवकाचे नाव हडपसर आणि पुरंदर अशा दोन्ही विधानसभा मतदार याद्यांमध्ये असणे आणि पाटबंधारे विभागाच्या जागेवर अतिक्रमणे करणे, असे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर, निवडून आलेले नगराध्यक्ष आणि नगरसेवकांचे पद रद्द करून नगरपरिषदेवर नवीन प्रशासक नेमावा, अशी मागणी तक्रारदाराने केली आहे. या तक्रारीच्या अनुषंगाने मुख्याधिकारी प्रसाद शिंगटे यांनी संबंधित नगरसेवकांना सात दिवसांत खुलासा सादर करण्याची नोटीस बजावली आहे.

> जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आलेल्या पत्रानुसार नगरसेवकांकडून खुलासा मागविण्यात आला आहे. उत्तर मिळाल्यानंतर सदरचा अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविणार आहोत.
>
> -प्रसाद शिंगटे, मुख्याधिकारी, फुरसुंगी-उरूळी देवाची नगरपरिषद

> अर्जाची छाननी आणि पडताळणी करूनच आमचा अर्ज निवडणूक अधिकाऱ्यांनी वैध ठरवला होता. विनाकारण हेतुपुरस्पर तक्रार करण्यात आली आहे. नगरपरिषदेचे नाव मलिन करण्याचा काही जण प्रयत्न करत आहेत.
>
> -उषा ढमाळ, नगरसेविका, फुरसुंगी नगरपरिषद

ठाकरे बंधुंचा ४ ऑक्टोबरला एसआयआरविरोधात जनमोर्चा



मुंबई : केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांची कार्यपध्दती आणि एसआयआर प्रक्रियेविरोधात मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि उध्दवसेनेचे पक्षप्रमुख उध्दव ठाकरे हे ४ ऑक्टोबर रोजी मुंबईत महाजनमोर्चा काढणार आहेत. राज ठाकरे यांनी 'एक्स'वर पोस्ट करून या मोर्चाची माहिती दिली आहे. मोर्चाची वेळ आणि ठिकाण लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचेही त्यांनी या पोस्टमध्ये म्हटले आहे. देशातील सत्ताधारी पक्षाची शाखाच आहोत अशा पध्दतीने मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक आयोगाने 'एसआयआर'च्या नावाखाली मतदारांची फसवणूक केली आहे. त्याविरोधात मनसे आणि उध्दवसेना हा जनमोर्चा काढणार आहे. आम्ही पुढाकार घेतला असला तरी हा मोर्चा सर्व राजकीय पक्षांचा आणि जनतेचा आवाज व्हावा. यासाठी सर्व राजकीय पक्षांशी संवाद साधून त्यांना सहभागी करून घेण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे, असे राज ठाकरे यांनी या पोस्टमध्ये म्हटले आहे.

तसेच, लोकशाही आणि संविधान वाचवण्यासाठी राज्यातील जनतेनेही मोर्चात सामील होण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

निवेदन
आपल्या प्रभागातील समस्या, दैनंदिन अडचणी, फसवणूक, अन्याय-अत्याचार, मुजोरी तसेच आपल्या मनातील सूचना, शंका, उपाय यासाठी सा. संघर्षाचा आवाज आपणास खास व्यासपीठ मिळवून देत आहे. करा त्वरा, होऊ द्या मनातला निचरा!
संपर्क : ७२७६८७१००८, ९६६५४८७१३४